लघुवाद न्यायालय, मुंबई येथील जुन्या इमारतीतील ४ थ्या मजल्यावरील न्यायीक अधिकाऱ्यांच्या विश्रामगृहाच्या स्थापत्य आणि विद्युत कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण- ०११९/५३/प्र.क्र.११/का-११
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २७ मे, २०१९.

संदर्भ:- १) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे No.B(W)६०१९/१९७६ (९६)/४८/१०३५, दि.०९.०१.२०१९ चे पत्र.
२) लघुवाद न्यायालय, मुंबई यांचे No.D-६/SCC/MW/GuestHouse/९७८१/२०१८, दि.१४.१२.२०१८ चे पत्र .
३) लघुवाद न्यायालय, मुंबई यांचे क्र.डी-२/लन्या/एमडब्ल्यू/गेस्ट हाऊस/९२८/२०१९, दि.०९ एप्रिल, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना:-

लघुवाद न्यायालय, मुंबई येथील जुन्या इमारतीतील ४ थ्या मजल्यावरील न्यायीक अधिका-यांच्या विश्रामगृहाची स्थापत्य आणि विद्युत कामे सन २००४ पासून आजतागायत करण्यात आलेली नाहीत. तसेच सदर विश्रामगृहात प्रथम श्रेणी अधिकारी म्हणून कार्यरत असणारे मा. न्यायाधीश महोदय राहतात त्यामुळे या विश्रामगृहाची स्थापत्य आणि विद्युत कामे करण्याकरीता एकूण रु. ९९,५१,९७७/- (स्थापत्य कामे रु.६३,२३,३०९/- व विद्युत कामे रु.३६,२८,६६८/-) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भिय अ.क्र. १ येथील पत्रान्वये मा.उच्च न्यायालयाने शासनास सादर केला होता. त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

लघुवाद न्यायालय, मुंबई येथील जुन्या इमारतीतील ४ थ्या मजल्यावरील न्यायीक अधिका-यांच्या विश्रामगृहाची स्थापत्य आणि विद्युत कामे सन २००४ पासनू आजतागायत करण्यात आलेली नसल्याने तसेच या विश्रामगृहात प्रथम श्रेणी अधिकारी म्हणून कार्यरत असणारे मा. न्यायाधीश महोदय राहत असल्याने तेथील स्थापत्य व विद्युत कामे करण्याकरीता येणाऱ्या एकूण रु. ९४,५३,३०९/- (रु.चौ-यान्नव लाख त्रेपन्न हजार तीनशे नऊ फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास / खर्चास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	बाब	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेली रक्कम रुपये
१	लघुवाद न्यायालय, मुंबई येथील जुन्या इमारतीतील ४ थ्या मजल्यावरील न्यायीक अधिका-यांच्या विश्रामगृहाचे नुतणीकरण १) स्थापत्य कामे २) विद्युत कामे	 रु.६३,२३,३०९/- रु.३६,२८,६६८/-	 रु.६३,२३,३०९/- रु.३१,३०,०००/-
	एकूण	रु.९९,५१,९७७/-	रु.९४,५३,३०९/-

२. सदर प्रकरणी तांत्रिक मान्यतेच्या अनुषंगाने प्रशासकीय रक्कम वाजवी राहील याबाबतची दक्षता घेण्यात यावी. तसचे प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविण्यात यावी. प्रशासकीय / तांत्रिक मान्यतेच्या अनुषंगाने इतर विहित नियमानुसार अनुषंगिक सर्व कार्यवाही पूर्ण करावी.

३. यावरील खर्च मागणी क्र.जे-१,२०१४ न्यायदान, १०६-लघुवाद न्यायालये,(००)(०१)इलाखा शहर न्यायालये (अनिवार्य) (२०१४ ०२१६) या लेखाशिर्षाखालील २७- लहान बांधकामे यामधून भागविण्यात यावा. तसेच सदर निधी पुरवणी मागणी / पुनर्विनियोजनाद्वारे तसेच त्या-त्या वित्तीय वर्षात आर्थिक तरतूद करुन भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौसं-३९/१९/इमा-२, दि. ३१.०१.२०१९ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २९२/व्यय-५, दि.०६.०५.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२९१३०४२६४०१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2019.05.29 13:14:47 +05'30'

(सं.सं.नवगिरे)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) मा.प्रबंधक (निरिक्षणे- २),उच्च न्यायालय, मुंबई.
२) मुख्य न्यायाधीश,लघुवाद न्यायालय, मुंबई.
३) महालेखापाल (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई.
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
६) वित्त विभाग, कार्यासन-व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
७) विधि व न्याय विभाग, कार्या-२३ व २४ मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती / का-११